सकाळ

पिंपरी चिंचवड, सोमवार, ३ फेब्रुवारी २०२५

६

# विद्यार्थ्यांकडून वनौषधींचा अभ्यास

■ श्रुती गांधी (रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी, चिंचवड)

श्री जैन विद्या प्रसारक मंडळ संचालित चिंचवड येथील रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी पुणे जिल्हा शिक्षण संस्थेच्या निगडीतील कॉलेज ऑफ आयुर्वेद अँड रिसर्च सेंटर येथील वनौषधी उद्यानाला भेट दिली. औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमामध्ये वनस्पतिशास्त्र विषय आहे. त्यासंदर्भात वनस्पतींच्या विविध जाती व त्यांचा उपयोग याविषयी विभाग प्रमुख डॉ. मीनल लाड व डॉ. इला भोर यांनी विद्यार्थ्यांना उद्यानातील औषधी वनस्पतींची माहिती दिली. यामध्ये अर्जुना, चंदन, गुळवेल, कमळ, रक्तचंदन, आवळा, सेना, पिंपळ, ओवा, हळद अशा वनस्पतींचा समावेश होता. पाचशेपेक्षा जास्त औषधी वनस्पतींची माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली. प्राचार्य डॉ. एस. ए. फेगडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. मंजुश्री गुंजेगावकर, प्रा. स्वाती ढगे यांनी संयोजन केले. ॲडव्होकेट राजेंद्रकुमार मुथा यांनी अभिनंदन केले.

RASIKLAL M. DHARIWAL COLLEGE OF PHARMACY
D-PHARM
Chinchwad Station, Pune-411 019.

**PRINCIPAL**
RASIKLAL M. DHARIWAL
COLLEGE OF PHARMACY
Chinchwad Station, Pune-411019